# विठ्ठलवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस ठाणे शहर

## पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
**Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in**




जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १९५ /२०२६ दि. ०९/०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, विठ्ठलवाडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि.१४/०९/२०२६ ते दि.२५/०९/२०२६ या कालावधीत सार्वजनिक 'गणेशोत्सव' साजरा होणार आहे. **दि.१५/०९/२०२६ रोजी (दीड दिवसाचे), दि.१८/०९/२०२६ रोजी (पाच दिवसाचे), दि. १९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दि.२०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी)** गणपती विसर्जन **होणार आहे.** या कालावधीत गणपती विसर्जन व मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(व) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** **१) श्रीराम चौक – ओ.टी. सेक्शन चौक – मेनबाजार – व्हिनस चौक – नेताजी चौक – भाटीया चौक – ३९ सेक्शन – गाऊन बाजार – दुध नाका – मठ मंदिर चौक– या विसर्जन मार्गावरील वाहतुक तसेच रहदारी ही गणपती विसर्जन मिरवणुक पुढील चौकात जाई** पर्यंत **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** श्रीराम चौकाकडून ओटी सेक्शनकडे जाणारी वाहने पेट्रोलपंपाचे बाजूने व्हि.टी.सी.रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**ब)** ओटी सेक्शनकडून मेन मार्केटकडे जाणारी वाहतुक हि उल्हास स्टेशन मार्गे इच्छीत स्थळी जातील

**क)** नेताजी चौकाकडून व्हिनस चौकाकडे जाणारी वाहने लालचक्की चौक व माणेरेगाव रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील

**ड)** कैलास कॉलनीकडून भाटीया चौक व नेताजी चौकाकडे येणारी वाहतुक हि संभाजी चौक व उल्हास स्टेशन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**इ)** दुधनाकाकडून गाऊन मार्केटकडे येणारी वाहतुक हि ओटी सेक्शन उल्हासनगर ५ मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**नो पार्कींग –** श्रीराम चौक – ओ.टी. सेक्शन चौक – मेनबाजार – व्हिनस चौक – नेताजी चौक – भाटीया चौक – ३९ सेक्शन– गाऊन बाजार– दुध नाका– मठ मंदिर चौक या विसर्जन मार्गावर जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दिनांक २५/०९/२०२६ रोजी दुपारी १४:०० वा ते रात्रौ २४:०० वा. पावेतो 'नो पार्किंग' करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग –** श्रीराम चौक – ओ.टी. सेक्शन चौक – मेनबाजार – व्हिनस चौक – नेताजी चौक – भाटीया चौक – ३९ सेक्शन – गाऊन बाजार – दुध नाका – मठ मंदिर चौक हा मुख्य विसर्जन मार्ग सोडून इतर पर्यायी मार्गावर पार्किंग मुभा देण्यात येत आहे.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना **दि.१५/०९/२०२६ रोजी (दीड दिवसाचे), दि.१८/०९/२०२६ रोजी (पाच दिवसाचे), दि. १९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दि.२०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी) गणेश मुर्ती विसर्जनाचे दिवशी दुपारी १४:०० वा. पासुन गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपे पर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका

**प्रत कार्यवाहीसाठी** :—

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ व ४ व विशेष शाखा, ठाणे

प्रत :— पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत कार्यवाहीसाठी** :—

सपोआ उल्हासनगर वाहतूक विभाग व कल्याण, पोनि. उल्हासनगर, विठ्ठलवाडी, कल्याण वाहतुक उपविभाग, ठाणे शहर
२/— उल्हासनगर म.न.पा. संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.